**ठळक बातम्या**

- १८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज राष्ट्रपतींच्या उपस्थितीत समारोप

- महाकुंभमेळ्यानिमित्त आकाशवाणीची विशेष वाहिनी ‘कुंभवाणी’ चं लोकार्पण

- पक्षीय राजकारणापलिकडे जाऊन राज्याच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा महाराष्ट्रातल्या जुन्या पिढीच्या नेतृत्वाने दिली असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी मानव अधिकार आयोगाकडून गुन्हा दाखल

**आणि**

- दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना जारी

**<><><><><>**

१८ व्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाचा आज शेवटचा दिवस असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू दुपारी समारोपाच्या अधिवेशनाला संबोधित करतील. या संमेलनाला ७५ देशांतून आलेले सुमारे ६ हजार प्रवासी भारतीय सहभागी झाले आहेत. त्यातल्या १७ जणांना, विविध क्षेत्रात बजावलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल, राष्ट्रपतींच्या हस्ते, 'प्रवासी भारतीय

सन्मान' प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचं थेट प्रसारण आकाशवाणीवरुन होणार आहे.

**<><><><><>**

लिंगभाव समानता आणि महिला सबलीकरण हे भारताच्या परराष्ट्र धोरण आणि आंतरराष्ट्रीय संबंधांचे अविभाज्य घटक असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी आज केलं. भुवनेश्वरमध्ये सुरू असलेल्या प्रवासी भारतीय दिवस संमेलनाच्या चौथ्या दिवसाच्या अध्यक्षपदाच्या भाषणात ते बोलत होते.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशात होणाऱ्या महाकुंभ मेळ्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या आकाशवाणीच्या 'कुंभवाणी' वाहिनीचं लोकार्पण आज उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या हस्ते प्रयागराज इथे झालं. महाकुंभ मेळा हा उत्सव जाती  धर्मापलिकडे जाऊन एकतेचा संदेश देतो असं ते  यावेळी म्हणाले. याच कार्यक्रमात त्यांनी 'कुंभमंगल धून'चं देखील उद्घाटन केलं. प्रसारभारतीचे अध्यक्ष डॉ. नवनीतकुमार सहगल, मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, दूरदर्शनच्या महासंचालक कांचन प्रसाद, तसंच आकाशवाणीच्या महांचालक डॉ. प्रज्ञा पालिवाल आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.  डॉ सहगल यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट... सहगल**

या आकाशवाणी वाहिनीवरून, आजपासून २६ फेब्रुवारी पर्यन्त महाकुंभमध्ये होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमावर आधारित अनेक कार्यक्रम प्रसारित करण्यात येतील. सकाळी ५ वाजून ५५ मिनिटांपासून रात्री १० वाजून ५ मिनिटांपर्यंत, या वाहिनीचं प्रसारण सुरू राहील. ही एफ एम वाहिनी १०३ पूर्णांक ५ अंश मेगा हर्टझवर, न्यूज ऑन ए आय आर या ॲप तसंच वेव्ह्ज ओ टी टी वर ऐकता येईल.

**<><><><>**

पक्षीय राजकारणापलिकडे जाऊन राज्याच्या हितासाठी काम करण्याची प्रेरणा महाराष्ट्रातल्या जुन्या पिढीच्या नेतृत्वाने दिली असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. राज्याचे दुसरे मुख्यमंत्री मारोतराव कन्नमवार यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त आज चंद्रपूरमधे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. विदर्भाच्या विकासाकरता कन्नमवार यांनी केलेल्या कार्याचा गौरव फडणवीस यांनी यावेळी केला.

**<><><><>**

उद्योगविषयक धोरणांमध्ये कालानुरुप बदल करण्याची गरज असून यासंदर्भात तातडीनं आराखडा तयार करण्याची कार्यवाही करावी असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. त्यांनी काल राज्य शासनाच्या १०० दिवसांच्या आराखड्यासंदर्भात उद्योग विभागाचा आढावा घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. महाराष्ट्र

औद्योगिक विकास महामंडळाकडच्या जागा वाटपाची प्रक्रिया १०० दिवसात पूर्ण करुन नवीन १० हजार जमीनींच्या अधिग्रहणासाठी प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. तरुणांना अप्रेंटीसशिप मिळावी यासाठी कार्यक्रम तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. तसंच तक्रार निवारण कक्ष, गुंतवणूक आणि निर्यात परिषदांचं आयोजन, गुंतवणूक प्रोत्साहन अनुदान रक्कमेचं तातडीनं वितरण, परकीय गुंतवणूक, उद्योग सेवा केंद्रांचे बळकटीकरण याविषयी बैठकीत चर्चा झाली. ऑरिक सिटी, दिघी पोर्ट आणि बिडकीन औद्योगिक शहरांमधली प्रलंबित कामं तातडीनं पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. दावोस गुंतवणूक परिषदेमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्येप्रकरणी मानव अधिकार आयोगानं गुन्हा दाखल करून घेतला असून या प्रकरणी आयोग स्वतंत्र चौकशी करणार आहे. संतोष देशमुख यांची अमानुषपणे केलेली हत्या ही माणुसकीला काळिमा फासणारी घटना असून याप्रकरणाची राष्ट्रीय मानव अधिकारी आयोगाने स्वतंत्रपणे चौकशी करावी अशी मागणी खासदार बजरंग सोनावणे यांनी केली होती. आयोग राज्य सरकारकडून अहवाल मागवणार असून सुरू असलेल्या तपासाची माहिती घेणार असल्याचं सोनावणे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणासंदर्भात सरकारची भूमिका संशयास्पद असल्याची टीका, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रकरणाला एक महिना झाला असून, आरोपीला कठोर शिक्षा होईल, असं सरकारच्या वतीनं वारंवार सांगण्यात येत आहे, मात्र अजूनही एका आरोपीला पकडण्यात आलं नसल्याचं सांगत सरकारचं याकडे लक्ष नसल्याची टीका दानवे यांनी केली.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीची अधिसूचना आज जारी झाली असून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. १७ जानेवारीपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येतील. तर २० जानेवारी पर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. या विधानसभा निवडणुकीत आम आदमी पार्टी, भाजप आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

पुण्यातल्या गिरीप्रेमी संस्थेचे ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना २०२३ चा, मानाचा तेन्सिंग नोर्गे राष्ट्रीय साहस जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या १७ जानेवारीला दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाईल. साहसी क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो.

**<><><><>**

मुंबईच्या प्रसिद्ध वानखेडे स्टेडियमच्या उभारणीला यंदा ५० वर्षं पूर्ण होत असून सुवर्णमहोत्सवानिमित्त १२ ते १९ जानेवारीदरम्यान विविध कार्यक्रम होणार आहेत. १९ जानेवारी रोजी होणाऱ्या भव्य कार्यक्रमात विख्यात क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर, सुनील गावस्कर, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, रवी शास्त्री, अजिंक्य रहाणे, दिलीप वेंगसरकर आणि डायना एदल्जी यांच्यासह इतर दिग्गज सहभागी होणार आहेत. या काळात विविध प्रदर्शनं, मनोरंजनाचे कार्यक्रम, लेझर शो देखील आयोजित केले जाणार आहेत.

**<><><><>**

नवी दिल्लीमध्ये येत्या १३ ते १९ जानेवारी दरम्यान होणाऱ्या पहिल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेसाठी जाहीर झालेल्या भारतीय पुरूष संघात महाराष्ट्रातल्या पाच तर महिला संघात तीन खो-खो-पटूंची निवड झाली आहे. पुरूष संघाच्या कर्णधारपदी पुण्याचा प्रतिक वाईकर आणि महिला संघाच्या कर्णधारपदी पुण्याचीच प्रियंका इंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><>**

भारत आणि आयर्लंड महिला क्रिकेट संघात राजकोट इथं सुरु असलेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात आयर्लंडने भारतापुढे

विजयासाठी २३८ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. गॅबी लुईस हिनं ९२ तर लिया पॉलनं ५९ धावा केल्या. भारताकडून प्रिया मिश्रा हिनं २ गडी बाद केले.

<><><><><>

पालघर जिल्ह्यात नालासोपारा इथं काल रात्री झालेल्या स्फोटात एकाच कुटुंबातले चारजण जखमी झाले. यात दोन लहान मुलांचाही समावेश आहे. परफ्यूमच्या बाटल्यांवरची वापराची शेवटची तारीख बदलण्याचा प्रयत्न करत असताना त्या बाटल्यांचा स्फोट झाला, असं पोलिसांनी सांगितलं. जखमी झालेल्या चौघांवर उपचार सुरू आहेत. पुढचा तपास सुरु आहे.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये बिजापूर जिल्ह्यात १३ माओवाद्यांनी पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. या माओवाद्यांवर एकूण १३ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. छत्तीसगड सरकारच्या पुनर्वसन धोरणांतर्गत आत्मसमर्पण केलेल्या माओवाद्यांना प्रत्येकी पंचवीस हजार रुपये देण्यात आले.

<><><><><>

देशात अनेक राज्यांत थंडीची लाट आणि घनदाट धुक्याची चादर कायम आहे. राजधानी नवी दिल्ली आणि एनसीआर परिसरात दाट धुक्यामुळे दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे. रेल्वे, हवाई वाहतुकीवर तसंच रस्ते वाहतुकीवरही परिणाम झाला आहे. आज सकाळी दृश्यमानता

अधिकच खराब असल्यानं इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरून सुमारे १५० हून अधिक विमानांची उड्डाणं विलंबाने होत आहेत.

**जम्मू आणि काश्मीर पंजाब, हरियाणा, छत्तीसगड आणि उत्तर प्रदेशासाठी** ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. **हिमाचल** प्रदेशातही उद्या आणि परवा पावसाची तसंच थंडीच्या लाटेची शक्यता वर्तवत हवामान विभागानं राज्याला यलो अलर्ट जारी केला आहे. **बिहार, झारखंड, ओदिशा आणि ईशान्येकडील** राज्यांतही थंडीची लाट आणि घनदाट धुक्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**